माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : 223/2022**

**तक्रारकर्ता, श्री. राजेंद्र तानबाजी सतई,**
**६९, महालक्ष्मी नगर नं. ३, गल्ली नं. ३,**
**मानेवाडा रोड, नागपूर-२४**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा महात्मा फुले उच्च प्राथमिक शाळा**
**चनकापूर (खापरखेडा), ता. सावनेर जि. नागपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**महात्मा फुले उच्च प्राथमिक शाळा चनकापूर (खापरखेडा),**
**ता. सावनेर जि. नागपूर**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १६.११.२०२२**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : अनुपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २१.०२.२०२२ | -- | ०५.०८.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार अपील क्र. ३०५२/२०१९, दिनांक २१.०२.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १६.११.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता श्री. राजेश सतई उपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा महात्मा फुले उच्च प्राथमिक शाळा चनकापूर (खापरखेडा), ता. सावनेर जि. नागपूर अनुपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक, महात्मा फुले उच्च प्राथमिक शाळा चनकापूर (खापरखेडा), ता. सावनेर जि. नागपूर श्रीम. संजीवनी आर. मेश्राम उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या (द्वितीय अपील क्र. ३०५२/२०१९) मध्ये दिनांक २१.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून " प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत मुद्दा क्र. ७ व ८ ची माहिती

संबंधित संस्थेकडून प्राप्त करून अपिलार्थीस विनामूल्य प्रदान करण्यात यावी" असे आदेशीत करून प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ०५.०८.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावरील आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दि १४.०७.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या व्दितीय अपिल आदेशात मुद्दा क्र. १ ची माहिती असल्यामुळे बहुद्देशिय शिक्षण संस्था फेटरी यांच्याकडे माहिती असून अपिलार्थी यांना माहिती प्रदान करण्यात आली नाही. श्रीम. संजीवनी मेश्राम, मुख्याध्यापिका महात्मा फुले उच्च प्राथमिक शाळा चनकापूर (खापरखेडा), ता. सावनेर जि. नागपूर यांनी दि.१२.११.२०२२ रोजी लेखी निवेदनात सचिव, महात्मा फुले बहुउद्देशीय शिक्षण संस्था, फेटरी नागपूर यांना मुद्दा क्र. ५ ते ८ ची माहिती संस्थेच्या निर्णयानुसार शाळेला पुरविण्यात आली तर, ती माहिती अपिलार्थी यांना प्रदान करता येईल, असे नमूद केले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती प्रदान करण्याबाबत दि. १२.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, पाठपुरावा केला आहे.

सदर व्दितीय अपिल आदेश अतिशय सुस्पष्ट असून सदर आदेशाची अमंलबजावणी करणे बंधनकारक आहे. मुद्दा क्र. ५ ते ८ बाबत माहिती प्रदान करणे महात्मा फुले बहुउद्देशीय शिक्षण संस्था, फेटरी नागपूर संस्थेला देखील कायदेशीररित्या बंधनकारक असून माहिती अधिकार अधिनिय २००५ कायद्यातील कलम ५ (१) अन्वये, या कायद्याखाली सर्व जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती संकलित करण्यात येवून त्यांना प्रदान करणे आवश्यक आहे. महात्मा फुले बहुउद्देशीय शिक्षण संस्था, फेटरी नागपूर संस्था यांच्याव्दारे महात्मा फुले उच्च प्राथमिक शाळा चनकापूर (खापरखेडा), ता. सावनेर जि. नागपूर यांनी ही अनुदानित संस्था आल्यामुळे तात्काळ संबंधित शाळेला माहिती उपलब्ध करून द्यावी. माहिती प्रदान न केल्यास सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १० जून, २००८ रोजीचे परिपत्रक व कलम १९ (८) (ग) व २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची करण्यात येईल. तसेच भारतीय दंड विधान संहिता कलम १६६ (अ), कलम १८८ अन्वये, त्यांच्याविरुध्द फौजदारी कार्यवाही करता येते. ही बाब लक्षात घेता, महात्मा फुले बहुउद्देशीय शिक्षण संस्था, फेटरी नागपूर यांच्या अधिनस्त असलेली माहिती शाळेला तात्काळ प्रदान करावी. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मुद्दा क्र. ५ ते ८ ची माहिती अपिलार्थी यांना तात्काळ प्रदान करावी, असे आदेशीत करुन प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण- नागपूर**
**दिनांक- १६.११.२०२२**

**जावक क्र.**7754**-----दिनांक-----**

2 8 DEC 2022

S/A-2022/223-2022/ सतई